# ‘स्थानिक’च्या निवडणूकप्रकरणी मोहोळ तालुक्यावर ‘संभ्रमा’चे ढग

## नरखेडकर म्हणाले, ‘महायुती’... माने म्हणताहेत, ओन्ली ‘घड्याळ’...अन् अनगरकरांची भूमिका ‘देखेंगे!’

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**उमेश पाटील यांची अजित पवार राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्यानं पुन्हा एकदा चर्चेत आलेल्या मोहोळ तालुक्यात मुख्यत्वे, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह महायुतीमधील संबंधितांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने, संभ्रमाचे वातावरण पसरले आहे. त्याला कारणदेखील तसेच आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ‘महायुती’च्या झेंड्याखाली लढल्या जातील, असे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी जाहीर केले. तद्नंतर अजित पवार यांचे विश्वासू सहकारी माजी आमदार यशवंत माने यांनी अनगर नगरपंचायत, मोहोळ नगरपरिषदेसह तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या केवळ ‘घड्याळ’ या चिन्हावर लढल्या जातील, शिवाय या तालुक्यातील महायुती असून नसल्यासारखी आहे, असे स्पष्टपणे त्यांनी सांगितले. तर ‘स्थानिक’च्या निवडणुकांमध्ये आजवर वर्चस्व ठेवलेल्या अनगरकर पाटील यांची भूमिका सध्या तरी गुलदस्त्यात म्हणजे ‘देखेंगे’ अशीच असल्याचे स्पष्ट होत आहे. परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबधी मोहोळ तालुक्यात चित्र स्पष्ट होताना दिसत नाही. संभ्रम आहे.**



अजित पवार



राजन पाटील



उमेश पाटील



यशवंत माने



बाळराजे पाटील



अजिंक्यराणा पाटील

- अजित पवार राष्ट्रवादीच्या तीन नेतेमंडळींच्या वेगवेगळ्या भूमिका
- अजित पवार राष्ट्रवादीसह महायुतीचे संबंधितजण पडले बुचकाळ्यात
- चित्र स्पष्ट होण्याची नेते, पुढारी, सर्वसामन्य कार्यकर्त्यांना प्रतिक्षा

### अनगकर पाटील समर्थकांचा ‘चलो भाजप...’चा वेगळाच नारा

उमेश पाटील यांना राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष देण्याला अनगरकर पाटील समर्थकांचा विरोध होता. अशातही अजित पवार यांनी या पदाची वरमाला उमेश पाटील यांच्याच गळ्यात घातली. त्यावर चिडलेल्या अनगरकर पाटील समर्थकांनी खुद्द अजित पवार यांच्यावर टिका करीत ‘चलो भाजप’चा नारा दिला होता. सध्य स्थितीमध्येदेखील उमेश पाटील यांच्या निवडीवरुन राजन पाटील गटात पेटलेलं वातावरण थंड झालेले नाही. तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेश पाटील यांच्या निवडीवरुन संतापलेल्या कार्यकर्त्यांची भूमिकादेखील काय असणार, हे पाहवं लागेल.

### लोकनेते परिवार अजित पवार राष्ट्रवादी गटाचा; मग समर्थकांकडून मोदी अन् भाजपचा नारा कसा?

माजी आमदार यशवंत माने यांनी मोहोळ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या अजित पवार राष्ट्रवादी पक्षाच्या घड्याळ या चिन्हावरच लढल्या जातील, असे ठासून सांगतानाच, लोकनेते परिवार हा अजित पवार राष्ट्रवादीचा गटाचा आहे, असेही सांगितले आहे. लोकनेते परिवारच जर अजित पवार गटाचा कट्टर समर्थक असेल तर या परिवाराच्या समर्थकांकडून सोशल मीडियावर मोदी अन् भाजपचा नारा का दिला जातोय, अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

विशेषत्वे, मोहोळ तालुक्यात अजित पवार राष्ट्रवादीची ताकद मोठी आहे. माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने तसेच जिल्हाध्यक्ष उमेश पाटील असे तगड्या नेतृत्वाचे अजित पवार गटाचे नेते या तालुक्यात आहेत. मात्र, हे संबंधित तीन नेते अनगर नगरपंचायत, मोहोळ नगरपरिषदेसह मोहोळ पंचायत समिती आणि तालुक्यातील जिल्हा परिषदेची निवडणूक कसे लढतील, याचे सध्या तरी कोडे आहे. उमेश पाटील आणि राजन पाटील यांच्यामध्ये आडवा विस्तव जात नाही. उमेश पाटील यांना जिल्हाध्यक्षपद दिल्यानं राजन पाटील हे नक्कीच दुखावलेले असणार. त्याशिवाय उमेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली राजन पाटील यांच्यासह बाळराजे ऊर्फ विक्रांत पाटील आणि अजिंक्यराणा पाटील हे निवडणुका कशा लढणार? सन्मान, स्वाभिमान, निवडणुकांमध्ये काढलेली एकमेकांची उणी-दुणी, ‘मै... बडा या मै.. बडा... तु..तु.. मैं...मैं...’अशी नेतृत्वाची, वर्चस्वाची लढाई अशा परिस्थितीत स्थानिकच्या निवडणुकांवेळी अनगरकर पाटील आणि नरखेडकर पाटील हे एकत्र कसे येणार?

त्याशिवाय माजी आमदार यशवंत माने आणि उमेश पाटील हे दोघेही अजित पवार यांचे अत्यंत निकटवर्तीय तसेच विश्वासू शिलेदार असले तरी या दोघांमध्ये ‘सख्य’ नाही. माने यांची राष्ट्रवादी पेक्षाही राजन पाटील यांच्याशी जवळीक जादा असल्याने उमेश पाटील यांना त्यांचे पटत नाही. यापूर्वी अनेकवेळा दोघे अनेक आघाड्यांवर शाब्दिकरित्या भिडले.

### कोंडी फोडणार कोण अन् कशी?

मोहोळ तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संथांच्या निवडणुका लढण्यासंबंधी राजन पाटील, उमेश पाटील आणि यशवंत माने हे ‘दिलसे’ एकत्र कसे येणार? त्यांना कोण एकत्र आणणार? या तालुक्यातील निवडणुका लढण्यासंबंधीची अजित पवार राष्ट्रवादी गटाच्या या तीन नेतेमंडळींनी एकत्र येण्यासंदर्भात जी कोंडी आहे, ती कोण फोडणार? कशी फोडणार? याचे मोठे औत्सुक्य तालुक्यात आहे. अनगरकर पाटील पर्यायाने लोकनेते परिवाराचे कट्टर अन् स्वाभिमानी समर्थक हे उमेश पाटील यांचे नेतृत्व कोणत्याही परिस्थितीत मानायचे नाही, त्यांच्या नेतृत्वाखाली काम करायचे नाही, या भूमिकेवर ठाम आहेत, दुसरीकडे उमेश पाटील हे तर जिल्हाध्यक्ष आहेत. पक्षाचा प्रोटोकॉल पाळायचा म्हटलं तर अनगकर पाटील यांना जिल्हाध्यक्ष म्हणून उमेश पाटील यांचं निवडणुकांमध्ये ऐकणं क्रमप्राप्त आणि बंधनकारक आहे. मात्र उमेश पाटील यांचं प्रोटोकॉल म्हणून ऐकलं जाणार की पक्षाचा प्रोटोकॉल मोडला जाणार, हे पाहणे महत्त्वाचं राहणार आहे.

माजी आमदार माने यांनी मोहोळ तालुक्यातील सगळ्या निवडणुका या अजित पवार राष्ट्रवादी पक्षाच्या ‘घड्याळ’ या चिन्हावरच लढणार, असे स्पष्ट सांगितले. मग उमेश पाटील यांनी महायुतीतर्फे निवडणुका लढवल्या जातील हे सांगितले. आता खरे कोणाचे मानायचे? त्याशिवाय या निवडणुकांमध्ये महत्त्वाची भूमिका असणाऱ्या माजी आमदार राजन पाटील यांनी कोणतेच भाष्य निवडणुकांवर अजून केलेले नाही. तेव्हा मुखत्वे, अजित पवार राष्ट्रवादी गटासह महायुतीमधील मित्र पक्ष शिंदे शिवसेना आणि भाजपमधील नेते, पदाधिकारी तसेच प्रमुच कार्यकर्ते यांच्यामध्येदेखील संभ्रमाचे वातावरण आहे. तेदेखील बुचकळ्यात पडले आहेत.

## भावकीतील दोन गटात काठी अन् कोयत्याने मारहाण

### गांजा पकडून दिल्याच्या संशय

✔ पंढरपूर/प्रतिनिधी



पूर्वीचे भांडण तसेच गांजा पकडून दिल्याच्या कारणावरून भावकीतील दोन गटात कोयता, खोऱ्याचा लाकडी दांडका आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत २ महिलासह चौघेजण जखमी झाले. ही घटना पंढरपूर येथील गोविंदपुरा येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी पंढरपूर शहरच्या पोलिसांनी परस्पर विरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील ८ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

**८ जणांवर गुन्हा**

यासंदर्भात पहिल्या गटातील पुनम नवनाथ कोरे (वय ३६ रा. लखाबाई मंदिराजवळ गोविंदपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोनाली ज्ञानेश्वर कोरे, तिचा पती ज्ञानेश्वर कोरे, पृथ्वीराज कांबळे आणि अभिजीत कांबळे (सर्व रा.गोविंदपुरा लखुबाई मंदिराजवळ) या चौघावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला. त्या शनिवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास घरासमोर काम करीत होत्या.त्यावेळी सोनाली कोरे हिने आमच्या गांजा का धरून दिला. या कारणावरून शिवीगाळ केली. पूनम यांनी शिव्या का देते ? असे विचारले असता तिने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी तिचा पती ज्ञानेश्वर याने लाकडी दांडक्याने त्यांच्या हातावर मारल्याने अंगठा फ्रॅक्चर झाला. भांडण सोडण्यासाठी त्यांची आई जयश्री कोळी आणि पती नवनाथ कोरे हे दोघे आले असतात त्यांना देखील सर्व आरोपींनी मिळून लाथाबुक्क्याने मारहाण केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

तर ज्ञानेश्वर सुबराव कोरे (वय ३८ रा.गोविंदपुरा) यांनी दिलेल्या विरुद्ध फिर्यादीवरून पुनम कोरे, तिचा पती नवनाथ सुबराव कोरे, मुलगा प्रतीक आणि पुनमची आई जयश्री कोळी (सर्व रा.गोविंदपुरा) या चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे.ज्ञानेश्वर कोरे यांची पत्नी सोनाली या घटनेच्या दिवशी कचरा टाकून घराकडे येत असताना पुनम कोरे हिने पत्नीच्या डोक्यात कोयता आणि दांडक्याने मारून गंभीर जखमी केले.तर इतर आरोपींनी पत्नीला लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यानंतर तिला आश्रम शाळेत नेऊन पुन्हा मारहाण केली.भांडण सोडवण्यास गेलेल्या पृथ्वीराज कांबळे यांना प्रतीक खोऱ्याने मारून जखमी केले. असे ज्ञानेश्वर कोरे यांच्या नमूद आहे. पुढील तपास हवालदार वाघमारे आणि हवालदार पाटील करीत आहेत.

## आषाढी वारी : प्रदक्षिणा मार्गावरील रहदारीचा अडथळा दूर होणार

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

आषाढी यात्रेच्या सोहळ्याला सुरुवात झाली असून, वारकरी भाविकांनी मंदिर परिसरात व दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे. या यात्रेचा मुख्य सोहळा रविवार दि. ६ जुलै रोजी होत आहे. त्यासाठी श्रींच्या पदस्पर्शदर्शनरांगेत व मुखदर्शनरांगेत बॅरीकेटींग करण्यात आलेले आहेत. तथापि, श्रींच्या मुखदर्शन रांगेत छत्रपती संभाजी चौक येथे कार्तिकी यात्रेप्रमाणे प्रदक्षिणा मार्गावरील रहदारीचा अडथळा लक्षात घेऊन सरकता उड्डाणपुल उभारण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची मुखदर्शनरांग श्री संत तुकाराम भवनच्या पाठीमागून छत्रपती संभाजी चौक पर्यंत असते. तथापि, छत्रपती संभाजी चौक येथे उड्डाणपुल नसल्याने दर्शनरांग सुलभ व जलद गतीने चालविण्यास तसेच प्रदक्षिणा मार्गावरील वारकरी भाविकांना मोठा अडथळा निर्माण होत होता. तसेच स्थानिक रहिवाशी व दुकानदारांच्या देखील तक्रारी प्राप्त होत होत्या.

**मुख दर्शनरांग सुलभ अन् जलद गतीने चालविण्यास होणार मदत : शेळके**

उड्डाणपुल ३० फुट लांबी व १० फुट उंचीचा असून, यामधील १२ फुटाचा भाग सरकता असल्याने, एकादशी दिवशी प्रदक्षिणा मार्गावर येणाऱ्या रथांना कोणताही अडथळा होणार नाही, १० फुटांपेक्षा जास्त उंचीचा रथ आल्यानंतर अत्यंत कमीतकमी वेळेत पुलाचा वरील भाग सरकवून रथ पार करता येणार आहे. उड्डाणपूल तांत्रिकदृष्ट्या योग्य व सक्षम असल्याबाबत यांत्रिकी कार्यशाळेचे प्रमाणपत्र देखील घेण्यात आले आहे. या उड्डाणपुलामुळे श्रींची दर्शनरांग द्रुतगतीने चालून भाविकांना जलद व सुलभ मुखदर्शन होणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.



मुख दर्शनरांगेत छत्रपती संभाजी चौक येथे सरकता उड्डाणपुल.

## ग्रामसडक योजनेतील सर्व कंत्राटी कर्मचारी सामूहिक रजेवर

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचारी आझाद मैदान मुंबई येथे कंत्राटी कर्मचारी नियमित वेतनवाढ व विविध मागण्यांसंदर्भात आमरण उपोषणास बसलेले आहेत. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी कर्मचारी रामदास बर्डे यांना पाठिंबा देण्यासाठी पूर्ण राज्यभरातून सामूहिक रजेवर जात आहेत.

महाराष्ट्र शासनातर्फे प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना हे अत्यंत महत्त्वाच्या योजना राज्याच्या ग्रामविकास विभाग मंत्रालयातर्फे राबविण्यात येतात मात्र या कामासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली असून या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन हे अत्यंत अत्यंत तुटपुंजी आहे तसेच या कर्मचाऱ्यांना ज्या शासकीय कर्मचाऱ्यांना सुविधा मिळतात त्या मिळत नाही हे कंत्राटी कर्मचारी मागील सतरा वर्षापासून या योजनेमध्ये काम करत आहे. मात्र राज्य शासनाने या कर्मचाऱ्यांचे मिळणारे मानधनात २०१८ पासून कसल्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. शासनाच्या या आडमुठ्या धोरणामुळे ग्रामीण भागाच्या विकासासाठी अहोरात्र झटणारे या कंत्राटी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे.

या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी रामदास बर्डे हे प्राणांतिक उपोषणासाठी आझाद मैदान मुंबई येथे बसलेले आहेत त्यांना पाठिंबा देण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी आता वज्रमूठ आवळलेली आहे. कर्मचाऱ्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामीण भागाच्या विकासावर विपरीत परिणाम होणार असल्याचे या विभागातील सर्व वरिष्ठ अधिकारी यांनी याबाबत शासनास अवगत केले आहे. तसेच या आंदोलनाला विविध राजकीय पक्ष तसेच कर्मचारी संघटनांनी पाठिंबा दिला आहे.

### ‘या’ आहेत मागण्या...

कंत्राटी कर्मचाऱ्यांना २०१२ पासून फरकासह समान कामाप्रमाणे मानधन वाढ देण्यात यावी, वार्षिक १० टक्के मानधन वाढ देण्यात यावी, नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रवास भत्ता देण्यात यावा, महिलांसाठी पूर्ण पगारी प्रसूती रजा पूर्ण पगारी ६ महिने देण्यात यावी, अपघात व वैद्यकीय रजा देण्यात यावी आदी मागण्यांसाठी ग्रामीण रस्ते विकास कंत्राटी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्याच्या वतीने रामदास बर्डे मुंबई येथील आझाद मैदानावर २३ जूनपासून आमरण उपोषणास बसले आहेत. या मागण्यांची दखल न घेतल्यास राज्यातील सर्व कंत्राटी कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसतील असा इशारा दिला आहे.

## माझ्या नावाचं क्रेडिट जाऊ द्या कचरा पेटीत

## बोरामणी विमानतळ उभारणं गरजेचं : सुशीलकुमार शिंदे

### श्रेय देण्या-घेण्यावरुन आंतरराष्ट्रीय दर्जाचं विमानतळ होत नसल्याबद्दल व्यक्त केली खंत

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापुरात एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या मनातील खंत जाहीरपणे बोलून दाखवली. तसेच, सध्याच्या होटगी रोड विमानतळाबाबतही भाष्य केले. या कार्यक्रमाला माजी उपमुख्यमंत्री आणि शिंदेंचे जुने सहकारी विजयसिंह मोहिते पाटीलही उपस्थित होते.**



सुशीलकुमार शिंदे





अनेकदा विमानतळासंदर्भात भूमिका घेऊनही आमचं आंतरराष्ट्रीय विमानतळ काही होऊ शकले नाही, असा उल्लेख पुस्तकात आहे. मात्र, ती माझीही खंत आहे, केवळ तुमचीच नाही, असेही सुशीलकुमार शिंदे यांनी स्पष्ट केले.

सोलापुरातील होटगी रोड विमानतळवरून सोलापूर-गोवा विमानसेवेला सुरुवात झाली आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ होऊ शकलेले नाही. शिंदे म्हणाले, सोलापूरमध्ये बोरामणीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ व्हावं, यासाठी अनेक वर्षे आपण प्रयत्न केले. आता ती सर्व गोष्ट मी सांगत बसत नाही. मात्र काही लोकांचा हट्टी स्वभाव असतो की इथंच झालं पाहिजे. पण, इथ कसं?

### सोलापूरसाठी मी खूप केलं पण...

बोरामणीच्या नियोजित विमानतळासाठी लागणारी जमीन माझ्या कारकिर्दीत जरी संपादीत केली असली तरी भविष्यासाठी बोरामणीला आंतराष्ट्रीय विमानतळ करण्याकरिता आमचं नाव बाजूला काढून कचऱ्याच्या पेटीत टाकलं तरी चालेल. पण सोलापूरच्या विकासासाठी बोरामणीचं विमानतळ होणं अतिशय महत्वाचं आहे. त्याचं क्रेडीट मिळो ना मिळो. तशा अनेक गोष्टी मी सोलापुरात केलेल्या आहेत. पण, आम्ही कधीही त्याचं क्रेडीट घेतलं नाही, असा दावा शिंदे यांनी केला.

### विमानतळासाठी आम्ही आड येणार नाही

सोलापूर शहराच्या आतमध्ये असणारं होटगी रोड विमानतळ सध्या सुरू झाले आहे. पण, ते किती दिवस टिकणार आहे. आम्ही म्हणतो की ठिकाय, सत्ता त्यांची आहे. चालू द्या. तेवढं तरी चालू द्या. पण तेही विमानतळ चालत नाही. आम्ही आडवं घालणार नाही, त्यातून तुम्ही मार्ग काढा, असे आवाहनही सुशीलकुमार शिंदे यांनी विरोधकांना केले आहे.